आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२४ मार्च २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्मीयांनाच अनुसुचित जातीचा दर्जा मिळू शकेल, असा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा

- पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाचे परिणाम दीर्घकाळ जाणवण्याची शक्यता असल्यानं एकजूट दाखवण्याचं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- भोंदू अशोक खरात विरोधात ८ गुन्हे दाखल, करचुकवेगिरीची चौकशी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत निवेदन

- राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि अनुदानित शाळांचं ऑडिट होणार

**आणि**

- युद्धविरामाच्या घोषणेनंतर देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी

**<><><><><>**

हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माची अनुयायी असणारी व्यक्तीच अनुसूचित जातीच्या दर्जासाठी दावा करू शकेल. ख्रिस्ती धर्मासारख्या इतर कोणताही धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तिचा अनुसूचित जाती दर्जा रद्द होईल, असं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. या तीन धर्मांव्यतिरिक्त इतर धर्म स्वीकारलेली कोणतीही दलित व्यक्ती अनुसूचित जाती आणि जमातींवरच्या अत्याचार प्रतिबंधक कायद्याचं उल्लंघन झाल्याचा दावा करू शकत नाही, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

आंध्र प्रदेशातल्या एका ख्रिस्ती धर्मगुरूनं उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठानं आज हा निर्णय दिला.

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या गंभीर परिस्थितीचे परिणाम दीर्घकाळ राहतील, त्यामुळे आपल्याला अशा परिस्थितीसाठी एकजूट दाखवावी लागेल, याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राज्यसभेत केला. कोरोना काळात दाखवलेली एकजूट

आपल्याला पुन्हा एकदा दाखवावी लागेल, असं आवाहन त्यांनी देशवासियांना केलं. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे देशासमोर गंभीर उर्जा संकट निर्माण झालं आहे. त्यामुळं इंधन, पुरवठा साखळ्या आणि खतं यांसारख्या घटकांवर धोरणं आखण्यासाठी सरकारनं ७ अधिकारप्राप्त गटांची स्थापना केली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. भारतानं युद्धाच्या सुरुवातीपासूनच संबंधित देशांच्या अध्यक्षांशी संपर्कात राहून शांततेसाठी प्रयत्न केले आहेत, तसंच व्यावसायिक जहाजं आणि होर्मुझची अडवणूक स्वीकारार्ह नाही, असंही मोदी म्हणाले.

**होल्ड.. बाईट- प्रधानमंत्री**

**<><><><><>**

भारतीय रेल्वेनं तिकीट रद्द करण्याच्या शुल्कात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवासाला ८ तास शिल्लक असताना रेल्वेचं तिकिट रद्द केलं तर कुठलाही परतावा मिळणार नाही, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली.

**होल्ड - रेल्वे मंत्री बाइट**

सध्या ४ तास आधी तिकिट रद्द केलं तर कुठलाही परतावा मिळत नाही. प्रवास सुरू व्हायला ७२ तासापेक्षा कमी वेळ आणि २४ तासापेक्षा जास्त वेळ शिल्लक असेल तर रेल्वेच्या भाड्याच्या २५ टक्के शुल्क आकारले जाईल. प्रवासाला सुरुवात करायला २४ तासापेक्षा जास्त आणि ८ तासापेक्षा कमी वेळ शिल्लक असेल तर ५० टक्के रद्दीकरण शुल्क आकारले जाईल.

**<><><><><>**

नाशिकमधल्या भोंदूबाबा अशोक खरातविरोधात ८ गुन्हे दाखल असून त्यातल्या ७ गुन्ह्यांचा तपास विशेष तपास पथकामार्फत सुरू आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. भोंदुगिरी, जादूटोणा, तंत्रमंत्र करत त्याने अनेक महिलांचं लैंगिक शोषण केल्याचं उघड झाल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली. खरातच्या मालमत्तेचं बाजारमूल्य सुमारे ४१ कोटी रुपये आहे. याप्रकरणी आयकर चोरी, करचुकवेगिरीचा तपास करण्यासाठी आयकर विभागाला कळवणार असल्याचं फडनवीस म्हणाले. त्याच्या संस्थांनाची, त्यावरच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची सखोल चौकशी सुरू आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

**- - - होल्ड मुख्यमंत्री - खरात बाइट - - -**

खरात परदेशी पळून जाण्याची शक्यता असल्यानं त्याच्या विरोधात लुकआऊट सर्क्युलर जारी करण्यात आलं होतं असंही त्यांनी सांगितलं. याप्रकरणातल्या पीडितांचे फोटो, व्हिडीओ समाज माध्यमांवर पसरले आहेत. ही सर्व सामग्री समाज माध्यमांवरुन काढून टाकण्याची कार्यवाही सुरू आहे, असं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, नाशिकच्या न्यायालयानं खरात याची पोलिस कोठडी आणखी पाच दिवसांनी वाढवली आहे.

<><><><><>

राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि अनुदानित शाळांच ऑडिट केलं जाणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत दिली. भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या शाळांची अवस्थांच्या संदर्भात लक्षवेधीवर उत्तर देताना ते बोलत होते.

महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदे सुधारणा विधेयक २०२६ आज विधानसभेत मंजूर झालं. कुळाला मालकीहक्क दिल्यानंतर दहा वर्षांनी विक्री परवानगी देताना आकारायची चाळीसपट रक्कम रद्द करणं, वर्ग २ ची जमीन वर्ग १ ची करूनच खरेदी करणं आदी तरतुदी यात आहेत.

<><><><><>

जादा परताव्याचं अमिष दाखवून फसवणूक केलेल्या प्रकरणांचा निकाल सहा महिन्यात दिला जावा याकरता कायद्यात बदल करण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला सांगितलं.

दिव्यांगाना प्रधानमंत्री आवास योजनेतून दिल्या जाणाऱ्या घरात रॅम्पची व्यवस्था केली जाईल असं गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांनी सांगितलं.

<><><><><>

विधिमंडळाच्या बाहेर झालेल्या घटनांवर निर्णय किंवा आदेश देण्याचा अधिकार हा सभागृहांच्या पीठासीन अधिकाऱ्यांना नाही, तर कार्यकारी मंडळाला आहे, असं निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानपरिषदेत दिलं. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीच्या वेळी झालेल्या गोंधळाप्रकरणी पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे निर्देश उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी काल दिल्याप्रकरणी ते बोलत होते.

**- - होल्ड बाईट-फडनवीस - - -**

पीठासीन अधिकारी हे कार्यकारी मंडळाच्या भूमिकेत जाऊ शकत नाहीत, तो अधिकार त्यांना नाही, असं ते म्हणाले. पीठासीन अधिकारी हे निर्देश देऊ शकतात, पण ते ब्रह्मवाक्य नाही, असं फडनवीस यांनी सांगितलं.

<><><><><>

विधानपरिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ मे महिन्यात संपणार असून उद्धव ठाकरे, नीलम गोऱ्हे, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, राजेश राठोड, संदीप जोशी, रणजीतसिंह मोहिते पाटील आणि संजय केनेकर यांना आज सभागृहात निरोप देण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतचा प्रस्ताव मांडला. राजकारणात मतभेद असतात, वेगवेगळ्या भूमिका असतात, पण यापलीकडचं नातंही असतं, ते म्हणजे सहप्रवासाचं, अशा भावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या सदस्यांना शुभेच्छा दिल्या.

<><><><><>

राज्यातलं सहकार क्षेत्र आणखी सक्षम, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी लवकरच नवं सर्वसमावेशक नवं सहकार धोरण आणण्यात येणार आहे, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी आज विधानपरिषदेत अल्पकालीन चर्चेच्या उत्तरात दिली.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पश्चिम आशियात युद्धविरामाची घोषणा केल्याचा सकारात्मक परिणाम आज देशभरातल्या शेअर बाजार दिसला. सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ३७२ अंकांची वाढ झाली आणि तो ७४ हजार ६८ अंकांवर बंद झाला. निफ्टीही ४०० अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ९१२ अंकांवर बंद झाला. मात्र युद्धाची परिस्थिती अजून पूर्ण स्पष्ट झाली नसल्यानं खबरदारी घेण्याचा सल्ला विश्लेषकांनी दिला आहे.

दरम्यान, कच्च्या तेलाच्या किंमती आज घसरल्या तर सोनं आणि चांदी महाग झालं.

//<><><><><>//